महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय (मागासवर्ग कक्ष)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१
Email Id - bccellnashik@gmail.com Tel No. ०२५३-२४६२४०१ ते ५

**जा.क्र.** **क्र.मावक/कार्या-१८/कावि-२/एसआर/ ८९२ /२०२३**
**दिनांक :- ०५.१२.२०२३**

प्रति,
कुलसचिव,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

विषय :- अध्यक्ष, किसान ज्ञानोदय मंडळ, गुढे, ता. चाळीसगांव, जि. जळगांव (कायम विना अनुदानित) या संस्थेची सरळसेवा संवर्गाची बिंदुनामावली नोंदवही तपासणी करणेबाबत.

संदर्भ :- विषयांकित कार्यालयाकडील क्रमांक जा.क्र.एन.डी.यु.एम.शिक्षणशास्त्र/२७५०/२०२३,दिनांक १६.१०.२०२३ प्राप्त दि. ०६.१२.२०२३

उपरोक्त विषयांकीत कार्यालयाने / संस्थेने खालील पदाची बिंदू नामावली नोंदवही तपासणीसाठी प्रस्ताव दिनांक ०६.१२.२०२३ रोजी या कार्यालयात सादर केलेला आहे.

**प्रकरणी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६-ब(ए), दिनांक ०६/०७/२०२१** अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील पिटीशन क्रं.३१२३/२०२० मध्ये दि.०५/०५/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरून राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय / निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीसाठी दिनांक ०४/०७/२०१९ च्या शासन निणयान्वये विहीत करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारीत करुन मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास स्थगिती दिल्याच्या दिनांकापासुन म्हणजेच दि.०९/०७/२०२० पासुन शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहीत करण्यात आली आहे.

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०२१/प्र.क्र.८३५/१६-ब, दिनांक २५.०२.२०२२** अन्वये बिगर आदिवासी व आदिवासी बहुल जिल्ह्याकरीता छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रं. आढावा १५१३/प्र.क्र.१२८ (भाग-८)/म.शि.५, दि. १२.११.२०२१ नुसार** मधील इ नुसार राज्यातील अशासकीय अनुदानित महाविदयांमधील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध निश्चित करण्याच्या अनुषंगाने उच्चस्तरीय सचिव समितीने काही बाबींची पुर्तता करण्याचे निर्देश दिलेले असल्याने, अद्याप आकृतीबंध निश्चित झालेला नाही. त्यामुळे पदभरतीवरील निर्बंध शिथिल करुन उपरोक्त प्रमाणे पद भरतीस मान्यता देतांना दिनांक ०१.१०.२०१७ च्या विदयार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी रिक्त पदे ही आधारभुत मानुन अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत. तथापि आकृतीबंध अंतिम झालेला नसल्याने, आकृतीबंधास वित्त विभागाची अंतिम मंजुरी मिळपर्यंत सदरची पदे अंतिम समजण्यात येवू नयेत. त्याव्यतिरिक्त पदांवरील पदभरती केल्यास अशा उमेदवाराच्या वेतनाची जबाबदारी ही संबंधित संस्थेची राहील.

**महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रं. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१, ११.०४.२०२२ व शासन राजपत्र दिनांक ०७.०४.२०२२ नुसार** विहीत केलेल्या तरतुदीनूसार प्रत्येक विदयापीठातील तसेच एकाच व्यवस्थापनेच्या नियंत्रणाखालील सर्व महाविदयालयांतील अध्यापक संवर्गातील (समान वेतनश्रेणीतील) सर्व विषयांतील मंजुर पदे एकत्रित करण्यात यावी असा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

विषयांकीत कार्यालयाच्या / संस्थेच्या खालील पदासाठी बिंदुनामावली **शासन निर्णय दिनांक ०६.०७.२०२१, २५.०२.२०२२, १२.११.२०२१, ११.०४.२०२२ व शासन पत्र दिनांक, २२.०८.२०१७, ०१.०२.२०२३ व २८.०२.२०२३ शासन अधिसुचना ०७.०४.२०२२** नुसार खालीलप्रमाणे बिंदुनामावली नोंदवहीची तपासणी करण्यात येत आहे.

**अध्यक्ष, किसान ज्ञानोदय मंडळ, गुढे, ता. चाळीसगांव, जि. जळगांव संचलित नानासाहेब डॉ. उत्तमराव महाजन शिक्षणशास्त्र महाविद्यालय, करगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव (कायम विना अनुदानित) या कार्यालयाने / संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या**



सहाय्यक आयुक्त (मावक)
नाशिक विभाग, नाशिक

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय (मागासवर्ग कक्ष)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१

Email Id - bccellnashik@gmail.com
Tel No. ०२५३-२४६२४०१ ते ५

कागदपत्रावरून व कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांनी केलेल्या प्राथमिक तपासणीस अनुसरून खालीलप्रमाणे बिंदु नामावली नोंदवही तपासणी करण्यात येत आहे.

एकाकी पद

०१) पदाचे नांव :- प्राचार्य (सरळसेवा १००%)
एकुण मंजुर पदे :- ०१ कार्यरत पदे :- ०० रिक्त पदे :- ०१

०२) पदाचे नांव :- ग्रंथपाल (सरळसेवा १००%)
एकुण मंजुर पदे :- ०१ कार्यरत पदे :- ०१ रिक्त पदे :- ००

उपरोक्त अ.क्र. ०१ ते ०२ संवर्गात प्रत्येकी एकाकी पद असल्याने शासन सा.प्र.वि निर्णय क्र. बीसीसी-१०९७/प्रक्र २०/९७/१६-ब दिनांक २१/०९/१९९८ नुसार व आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ३ (१) (घ) तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही.

---

०३) पदाचे नांव :- सहायक प्राध्यापक (शिक्षणशास्त्र) (सरळसेवा १००%)
एकुण मंजुर पदे :- ०२ कार्यरत पदे :- ०० रिक्त पदे :- ०२

-: मंजुर पदसंख्येनुसार आरक्षणाची विगतवारी :-

| अ. क्र. | तपशिल | अ.जा | अ.ज | विजाअ | भजब | इमाव | भजक | आदुघ | भजड | विमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजुरपदे | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| २ | कार्यरतपदे | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | रिक्तपदे | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |

02 पदांचे आरक्षण पुढीलप्रमाणे :- अजा, अज, विजाअ, भजब, इमाव, भजक, आदुघ, भजड, विमाप्र या क्रमाने आळीपाळीने 01 पद, खुला-01 याप्रमाणे एकुण 02 पदे.

कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, कार्यरत 00 पद भरलेले आहे.

**पहिले भरती वर्ष**

**(दिनांक 01.01.2023 ते दिनांक 31.12.2023)**

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. बीसीसी-2019/प्र.क्र.118-ए/16ब, दि. 18.02.2019 नुसार ईडब्लुएस करीता गणना खालीलप्रमाणे**

| पहिल्या भरती वर्षात एकुण भरावयाची पदे | ईडब्ल्युएस करीता पहिल्या भरती वर्षात एकुण भरावयाच्या पदांच्या १० टक्केवारी नुसार येणारी पदे | भरती प्रक्रिये अंती ईडब्ल्युएस वर्गाची प्रत्यक्ष भरलेली व कार्यरत पदे |
|---|---|---|
| ०२ | ०२X१०/१००=०.२०<br>पुर्णांकात ०० पदे | ०० |

**पहिल्या भरती वर्षात भरावयाची पदेखालील प्रमाणे**

अनुशेष -

| अ.क्र. | तपशिल | अ.जा | अ.ज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्यूएस | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | एकुण भरावयाची पदे | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |

टीप - या कार्यालयाकडील मागील तपासणी दि. ०६.०१.२०२३ अन्वये उपरोक्त संवर्गात श्री. वसावे एस.बी. यांना अ.ज.-०१ याप्रमाणे कार्यरत पद दर्शविण्यता आले होते. सद्यस्थितीत श्री. वसावे यांना सहायक प्राध्यापक (गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे) या संवर्गात कार्यरत दर्शविण्यात आले आहे. उपकुलसचिव, आरक्षण कक्ष, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचेकडील खुलासा पत्र क्र. कबचौउमवि/१३/११३/२०२३, दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये श्री. वसावे यांचा विषय सामाजिक शास्त्र असल्याने NCTE च्या नियमानुसार, सामाजिक शास्त्र हा विषय सहायक प्राध्यापक (शिक्षणशास्त्र) व सहायक प्राध्यापक (गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे) या दोन्ही संवर्गात समाविष्ट आहे. यास्तव सदर तपासणीत श्री. वसावे यांना सहायक प्राध्यापक (गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे) या संवर्गात कार्यरत दर्शविण्यात आले आहे. सदर खुलासा व प्राथमिक तपासणीस अधिन राहून संस्थेची बिंदुनामावली तपासणी करण्यात येत आहे. सदर बाबत भविष्यात कोणताही वाद, तक्रार अथवा न्यायालयीन बाब उद्‌भवल्यास त्यास प्राथमिक तपासणी अधिकारी व अध्यक्ष, किसान ज्ञानोदय मंडळ, गुढे, ता. चाळीसगांव, जि. जळगांव हे जबावदार राहतील, याची नोंद घ्यावी.

सहाय्यक आयुक्त (मावक)
नाशिक विभाग, नाशिक

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय (मागासवर्ग कक्ष)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१
Email Id - bccellnashik@gmail.com Tel No. ०२५३-२४६२४०१ ते ५

०४) पदाचे नांव :- सहायक प्राध्यापक (गणित, विज्ञान, सामाजिकशास्त्रे, भाषा) (सरळसेवा १००%)
एकुण मंजुर पदे :- ०४ कार्यरत पदे :- ०२ रिक्त पदे :- ०२

-: मंजुर पदसंख्येनुसार आरक्षणाची विगतवारी :-

| अ. क्र. | तपशिल | अ.जा | अ.ज | विजाअ | भजब | इमाव | भजक | आदुघ | भजड | विमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजुरपदे | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०४ |
| २ | कार्यरतपदे | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| ३ | रिक्तपदे | ०१ | -०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |

04 पदांचे आरक्षण पुढीलप्रमाणे :- अजा, अज या क्रमाने आळीपाळीने 01 पद, विजाअ, भजब, इमाव, भजक, आदुघ, भजड, विमाप्र या क्रमाने आळीपाळीने 01 पद, खुला-02 याप्रमाणे एकुण 04 पदे.

कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, अज-01, खुला-01 याप्रमाणे कार्यरत पदे दर्शविलेली आहेत.

कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, अ.ज.-01 याप्रमाणे अतिरीक्त पद भरलेले आहे.

संस्थेने अज या प्रवर्गात अतिरीक्त पद भरलेले दिसून येते. सदरचे अतिरीक्त ०१ पद भरलेले दिसून येते. सदरचे ०१ पद खुले ०१ पदात समायोजित केल्याने (महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र. बीसीसी/२००९/प्र.क्र३३५/१६ब,दि.०६.०४.२००९) नुसार खुल्या प्रवर्गात पद रिक्त राहणार नाही. तसेच अज या प्रवर्गात पद अतिरीक्त दिसणार नाही.

सद्यस्थितीत खुला प्रवर्गात पद रिक्त नसल्याने ईडब्ल्युएस करिता आरक्षण प्रमाणित करता येत नाही.

**पहिल्या भरती वर्षात भरावयाची पदे खालील प्रमाणे**

अनुशेष -

| अ.क्र. | तपशिल | अ.जा | अ.ज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्यूएस | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | एकुण भरावयाची पदे | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |

---

## अटी

१. सरळसेवा भरती करतांना समांतर आरक्षण विचारात घ्यावे.

२. मागासवर्गीय अनुशेष प्राधान्याने भरावा.

३. सर्व मागासवर्गीय कर्मचा-यांचे जातप्रमाणपत्र व जातवैधताप्रमाणपत्र प्राप्त करुन दप्तरी ठेवावे.

**४. सदर बिंदूनामावली नोंदवही अध्यक्ष, किसान ज्ञानोदय मंडळ, गुढे, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांचेकडील जावक क्रमांक एनडीयुएम.शिक्षणशास्त्र/२७५०/२०२३, दि. १६.१०.२०२३ रोजीचे प्रमाणपत्रास अधिन राहुन प्रमाणीत करण्यात येत आहे. बिंदू नामावली नोंदवहीबाबत काही न्यायालयीन तक्रार उद्भवल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील.**

५. शा.नि.क्र.बीसीसी -२०१२/प्र.क्र.३३१/१२ /१६ब दि.१८.०५.१३ अन्वये सेवेत असलेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांपैकी ज्यांनी अद्याप जातवैधता तपासण्यासाठी जातपडताळणी समितीकडे अर्ज सादर केला नाही. अशा कर्मचा-यांबाबतीत प्रस्तुत शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

६. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांच्या आधारे दि.१५.०६.१९९५ पुर्वी नौकरीस लागलेल्या कर्मचा-यांपैकी जे कर्मचारी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरविल्यानंतर जे त्या मागासवर्गीय प्रवर्गाचे आहेत. त्या मागासवर्गीय प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकत नाही. अशा कर्मचा-यांच्या बाबतीत शासन निर्णय क्रं.बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३१/१२/१६-ब, दि.१८/०५/२०१३ मधील अ.क्र.०५ व ०६ नुसार कार्यवाही करावी.

सहाय्यक आयुक्त (मावक)
नाशिक विभाग, नाशिक

D:\New Folder\New Folder\किसान ज्ञानोदय मंडळ, चाळीसगाव, जळगांव\Letter.Docx

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय (मागासवर्ग कक्ष)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१
Email Id - bccellnashik@gmail.com Tel No. ०२५३-२४६२४०१ ते ५

७. शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१५/प्र.क्र.२७६A/१४/१६-ब, दि.२१/१०/२०१५ अन्वये दि.१५/०६/१९९५ नंतर दि.१७/१०/२००१ पर्यंत या कालावधीत अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्रांच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या ज्या कर्मचा-यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचा-यांनी अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अदयापपर्यंत सादर केलेले नाही, अशा कर्मचा-यांचे बाबतीत प्रस्तुत शासन निर्णयान्वये कार्यवाही करावी.

८. मागासवर्गीय कर्मचा-यांचे जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास अशा कर्मचा-यांबाबतीत शासन निर्णय दिनांक १८/०५/२०१३, दिनांक २१/१२/२०१९, दिनांक २१/१०/२०१५ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

९. नियुक्ती प्राधिकारी यांनी सादर केलेले कागदपत्र व पुरविलेल्या माहितीच्या आधारे बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर माहिती चुकीची असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील.

१०. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१९ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.८९२९/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६.०७.२०१७ रोजी दिलेल्या अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे रिक्त करणेबाबत सुचना पारित केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१९ अंन्वये कार्यवाही करण्यात यावी.

**११. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण -२२०५/प्र.क्र. ९८/ विशि-१, दिनांक २४.०६.२०२२ अन्वये अ.क्र. ३ मधील मुद्दयाबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे की, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम २०२१ मधील तरतुदीनुसार सदर संवर्गनिहाय आरक्षण ज्या संस्थांना राज्य शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अनुदान मिळते अशा शैक्षणिक संस्थांना लागु असल्याने विना अनुदानित / कायम विना अनुदानित संस्थांना सदर आरक्षण धोरणातील तरतुदी लागु होणार नाहीत, असे कळविले आहे. तरी सदर पत्राच्या अधिन राहून विषयांकीत संस्थेची (विना अनुदानित) जुन्या आरक्षण धोरणानुसार सहायक प्राध्यापक व ग्रंथपाल इ. पदे वेगवेगळी करुन बिंदुनामावली नोंदवही तपासणी करण्यात येत आहे. त्याबाबत उपकुलसचिव (आरक्षण कक्ष), कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांनी त्यांचेकडील पत्र क्र. कबचौउमवि/१३/१०५/२०२३, दि. ०६.१०.२०२३ अन्वये प्राथमिक तपासणी केलेली आहे. तरी प्राथमिक तपासणीच्या अधिन राहून विषयांकीत संस्थेची बिंदुनामावली नोंदवही तपासणी करण्यात येत आहे. याबाबत भविष्यात कोणत्याही प्रकारचा वादविवाद, तक्रार अथवा न्यायालयीन बाब उद्‌भवल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी व आपले कार्यालयाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१२. विषयांकीत संस्थेची शिक्षण सहसंचालक, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र. ससंउशि/जविज/बी.एडसुआ/२०२२, दि. ११.०७.२०२२ अन्वये २०२२-२०२३ या वर्षासाठी पदनिश्चिती करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांनी त्यांचेकडील पत्र क्र. कबचौउमवि/१३/१०५/२०२३, दि. ०६.१०.२०२३ अन्वये प्राथमिक तपासणी केलेली आहे. तरी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील आकृतीबंध व प्राथमिक तपासणी याबाबींच्या अधिन राहून विषयांकीत संस्थेची बिंदुनामावली नोंदवहीची अंतिम तपासणी करण्यात येत आहे. याबाबत भविष्यात कोणत्याही प्रकारचा वादविवाद, तक्रार अथवा न्यायालयीन बाब उद्‌भवल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी व आपले कार्यालयाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१३. महाराष्ट्र शासन, उच्च तंत्रशिक्षण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/(४९५/१६)/विशी-१, दि. २३.०९.२०१६ व दि. २२.०१.२०१४ नुसार विषयांकीत कार्यालयातील प्राचार्य व सहायक प्राध्यापक या पदाची आरक्षणाची विगतवारी करण्यात आली आहे.**

सहाय्यक आयुक्त (मावक)
नाशिक विभाग, नाशिक

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय (मागासवर्ग कक्ष)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, नाशिकरोड ४२२१०१
Email Id - bccellnashik@gmail.com
Tel No. ०२५३-२४६२४०१ ते ५

१४. **महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-११२२/प्र.क्र.१००ए/१६ब, दि. ०५.०७.२०२२ नुसार नमुद केलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, तसेच सरळसेवा भरती / आरक्षण/अनुशेष बाबतचे विवरणपत्र कार्यालयाच्या सुचना फलकावर लावणेबाबतची जबाबदारी संबंधित कार्यालय व नियुक्ती प्राधिकारी यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

- उपसचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.२०० A/१६-ब दिनांक १९.०४.२०१८ नुसार खालील परिस्थितीत बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक राहील.
  १. मागासवर्ग कक्षाकडुन रोस्टर पडताळणी झाल्यानंतर तीन वर्षानंतर किंवा दरम्यानच्या कालावधीत मंजुर पदसंख्येत वाढ / घट झाल्यास पदभरतीच्या वेळी अथवा सेवाप्रवेश नियमात बदल झाल्यास विहीत मुदतीपुर्वी बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करुन घ्यावी.
  २. प्रत्येक वर्षी जर कार्यरत पदसंख्येमध्ये बदल होत असेल म्हणजेच रिक्त पदसंख्या बदलत असेल अशा वेळी दरवर्षी रोस्टर तपासुन आरक्षण निश्चीती करणे आवश्यक राहील.
  ३. पदभरतीच्या वेळी देखील बिंदुनामावली नोंदवही तपासणी करणे आवश्यक राहील.
  ४. आरक्षणाची योग्य रितीने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने ज्यावेळी कार्यरत पदसंख्या बदलत असेल अशावेळी म्हणजेच दरवर्षी रोस्टर तपासणे आवश्यक राहील.
  ५. ज्यावेळी मंजुर पदसंख्या, कार्यरत पदसंख्या व रिक्त पदसंख्या यामध्ये कोणताही बदल होत नसेल अशावेळी दरवर्षी रोस्टर न तपासता दर तीन वर्षांनी रोस्टर तपासणे उचित होईल.

  वरील परिस्थीतीत वेळचे वेळी बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन पत्र दि. ०१.०२.२०२३ व २८.०२.२०२३ मधील १७ पदांमधील पदे नाहीत.**

**महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटकया जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) अन्वये उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे पदे आरक्षित ठेवणे व आरक्षणनिहाय पदे भरणे ही नियुक्ती प्राधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. सदर तरतुदींचे पालन न केल्यास संबंधिताविरुद्ध अधिनियमाच्या कलम ८ अन्वये पुढील कार्यवाही करण्याची जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील यांची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.**

सहाय्यक आयुक्त (मा.व.क.) नाशिक विभाग, नाशिक
सत्यमेव जयते

**(कुंदन हिरे)**
**सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक**

**प्रत:-** माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१) मा. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग,कक्ष-१६ब, मावक, मंत्रालय, मुंबई-३२ सविनय सादर
२) **अध्यक्ष, किसान ज्ञानोदय मंडळ, गुढे, ता. चाळीसगांव, जि. जळगांव**
३) निवडनस्ती

D:\New Folder\New Folder\किसान ज्ञानोदय मंडळ, चाळीसगाव, जळगांव\Letter.Docx